महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९२५ /२०२२ दि. २३/१२/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, राबोडी वाहतूक उप विभागाचे हददीत सरस्वती विद्यालय गेट नं. २ ते पंचगंगा सोसायटी लगत रस्त्यावर दोन्ही बाजूस सदर परिसरातील रहिवासी, दुकानदार व ग्राहक हे त्यांची वाहने पार्क करीत असल्याने सदर परिसरात दैनंदिन वाहतूक कोंडी होत असते. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी पी–१ व पी–२ पार्किंग व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**१) पी–१ व पी–२ पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण. | प्रकार | अंतर |
|---|---|---|---|
| १ | राबोडी सरस्वती विद्यालय गेट नं. २ ते पंचगंगा सोसायटी, राबोडी | पी–१ | ३०० मीटर |
| २ | पंचगंगा सोसायटी, राबोडी ते राबोडी सरस्वती विद्यालय गेट नं. २ | पी–२ | ३०० मीटर |

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत असून कोणाची काही हरकत असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त कार्यालय, वाहतूक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत काही सुचना आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

- मा. जिल्हाधिकारी, ठाणे
- मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–१, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
- नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
- ठाणे पोलीस पत्रक

**प्रत :–** समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि राबोडी वाहतूक उपविभाग.

Scanned with CamScanner